राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
मागासवर्ग विशेष कक्ष
(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थपित व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)
छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकिय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग नागपूर
दूरध्वनी क्रमांक ०७१२–२५५०९९३

क्रमांक : माविक/शिष्यवृत्ती/८० दिनांक : २२.११२०१६

प्रति,

संलग्नित/संचालित महाविद्यालयाचे प्राचार्य/
शैक्षणिक विभागाचे विभाग प्रमूख/मा. संचालक, ल.ता.संस्था
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

विषय :– भारत शासन शिष्यवृत्ती व शिक्षक मतदार संघाच्या मतदार यादीकरिता नावे नोंदविण्याकरिता आढावा बैठक

संदर्भ :– १.मा. प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण विभाग यांचे पत्र क्रंप्राउसकविना/भासशि/महा. प्रलंबित अर्ज/६२२०/२०१६–१७ दिनांक १७.११२०१६

२. मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी नागपूर यांचे पत्र क्रमांक निवडणूक–२/कार्या–३/कावि २७९/२०१६, दिनांक १८ ऑक्टोंबर २०१६.

महोदय/महोदया,

संदर्भाकिंत पत्राच्या अनुषंगाने विषयांकित बाबी संबंधी आपणास कळविण्यात येते कि, खालील नमुद विषयावर आढावा घेण्यासाठी मा. कुलगुरु महोदयांच्या अध्यक्षतेखाली **बुधवार दिनांक ३०.११.२०१६ रोजी दुपारी १.०० वाजता** विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृह रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर बैठकीला सामाजीक न्याय विभागाचे प्रादेशिक उपायुक्त व नागपूर विभागातील सर्व सहाय्यक आयूक्त उपस्थित राहतील. आपणास नम्र विंनती आहे की उपरोक्त बैठकीस आपण कृपया न चुकता उपस्थित राहावे.

**विषय क्रं १.**

मा. उपायुक्त समाज कल्याण विभाग नागपूर यांनी सत्र २०१५–२०१६ व सत्र २०१६–२०१७ चे शिष्यवृत्तीचे अर्ज महाविद्यालयाच्या स्तरावर प्रलंबित असल्याचे कळविले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना भारत सरकार योजना आणि शिक्षण व परिक्षा शुल्क माफिचे योजनेचा लाभ मिळण्यास विलंब होत आहे.करिता सदर प्रलंबित अर्ज निकाली काढणे चालू वर्षाचे नियोजन करणे आणि वरिल योजनेची प्रभावी अंमलबजावणी विहित कालावधीत करण्यासाठी खालील नमुद मुधांचा आढावा घेवून संबंधितांना आवश्यक सूचना देण्यात येणार आहेत.

१. विनाअनुदानित अभ्यासक्रमांचे विद्यार्थ्यांचे अर्ज विहित मुदतीत संबंधीत कार्यालयास तपासणीसाठी सादर केली जात नाही.
२. अनुदानित/विनाअनुदानित अव्यवसायिक अभ्यासक्रमाची तथा कनिष्ठ महाविद्यालय ऑनलाईन शुल्क मंजूरिस्तव आवश्यक दस्तावेज कार्यालयास सादर करित नाही.
३. त्रृटीचे अर्जाची त्रृटीपूर्तता विहित कालावधीत पूर्ण केली जात नाही.
४. चालु शैक्षणिक सत्रात शिष्यवृत्तीच्या अनुषंगाने करावयाची महाविद्यालय स्तरावरील ऑनलाईन कार्यवाही महाविद्यालयाद्वारे पूर्ण केली जात नाही.
५. चालू शैक्षणिक सत्रातील विद्यार्थ्यांचे अर्ज सत्राचे सुरवातीस कार्यालयास सादर न करता शैक्षणिक वर्ष संपण्याच्या एक महिना अगोदर कार्यालयास ऑनलाईन सादर करण्यात येतात तसेच मागिल वर्षाचे चालू वर्षात सुध्दा संबंधित कार्यालयास सादर करण्यात येत आहे.
६. आवश्यक दस्तावेज कार्यालयास सादर केली जात नाही.

विषय २

मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या आदेशानूसार नागपूर जिल्ह्यातील महाविद्यालयातील व विद्यापीठातील शैक्षणिक विभागात कार्यरत असलेल्या शिक्षकांच्या नावाची शिक्षक मतदार संघांच्या मतदार यादित नोंदणीकरिता फॉर्म नमूना–१९ व सूचनापत्र यापूर्वीच आपणाकडे पाठविण्यात आलेले आहे. सदर सूचनापत्रानूसार आपल्या महाविद्यालयातील/विभागातील किती शिक्षकांचे नमुना –१९ फॉम मा. जिल्हाधिकारी कार्यालयात सादर केलेले आहेत? याबाबतचा आढावा सदर बैठकीमधे घेण्यात येणार आहे तसेच आपल्या अधिनस्थ असलेल्या किती शिक्षकांनी आतापर्यंत फॉम नमुना–१९ भरलेला आहे व किती शिक्षकांनी अद्याप भरलेले नाहीत. यासंबंधीचा अहवाल खालील तक्त्यात नमूद करुन सदर बैठकीस येतेवेळेस सोबत आणावा. अशी आपणास विनंती आहे.

| पात्र शिक्षकांची संख्या | फॉर्म नमुना–१९ सादर केलेल्या शिक्षकांची संख्या | फॉर्म नमुना–१९ न भरलेल्या शिक्षकांची संख्या (उर्वरित शिक्षक ) | शेरा |
|---|---|---|---|
| | | | |

(पुरणचंद्र मेश्राम)
कुलसचिव

प्रतिलीपी :–

१. मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी व उपजिल्हा निवडणूक अधिकारी, नागपूर.
२. उपकुलसचिव मा कुलगुरु कार्यालय, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

} यांच्या माहितीस्तव

३. मा. उपजिल्हा निवडणूक अधिकारी, नागपूर.
४. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर.
५. मा. प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण विभाग, नागपूर.
६. मा. सहाय्यक आयुक्त, नागपूर.
७. मा. सहाय्यक आयुक्त, भंडारा .
८. मा. सहाय्यक आयुक्त, गांदिया.
९. मा. सहाय्यक आयुक्त, वर्धा .

} आपणास विनंती करण्यात येते की सदर आढावा बैठकिस कृपया उपस्थित राहावे.

(डॉ. अनिल हिरेखन)
(उपकुलसचिव (मा.वि.क.)
अतिरिक्त प्रभार